# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.
## पाणी पुरवठा विभाग

**विषय :- भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका मालकीचे काटई गावांमधील मलप्रक्रिया केंद्रे व अजय नगर येथील ड्रेनेज पंपींग स्टेशन यांची देखभाल, निगा व दुरुस्ती करणे बाबतच्या प्रस्तावाची ई-निविदा मागविणे कामी मान्यता मिळणे बाबत.**

भिवंडी महानगरपालिकेच्या मालकीचे काटई गावामधील मल:प्रक्रिया केंद्रे व अजय नगर येथील ड्रेनेज पंपींग स्टेशन हे मार्च २०१६ रोजी बांधून पुर्ण होऊन चाचणी व परिक्षणानंतर सुरु करण्यांत आलेले आहे. काटई येथील नविन १३ द.ल.ली. क्षमतेचे व जुने १७ द.ल.ली. क्षमतेचे मल:प्रक्रिया केंद्रे अस्तित्वात असुन सद्यस्थितीत नवीन १३ द.ल.ली. क्षमतेचे मल:प्रक्रिया केंद्र कार्यान्वित आहे. तसेच अजय नगर येथील पंपींग स्टेशन कार्यान्वित आहे. सदर संपुर्ण प्रकल्प चालु स्थितीत ठेवणे करीता मनपा आस्थापनेवर सदर बाबतचे तांत्रिक ज्ञान असलेले अभियंते / कर्मचारी उपलब्ध नाहीत.

भुयारी गटार योजना टप्पा-१ चे ठेकेदार मे. ईगल इन्फ्रा कंपनी यांची कामाची मुदत संपुन चाचणी परिक्षण कालावधी देखील संपलेला आहे. सद्यस्थितीत ७ ते ८ द.ल.ली. इतक्या पाण्यावर प्रक्रिया होत असुन सदर मल:प्रक्रिया केंद्र कार्यान्वित होऊन अडीच वर्षाचा कालावधी झाल्यामुळे बऱ्याच प्रमाणात दुरुस्तीचे काम करावे लागणार आहे.

तसेच महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, कल्याण यांचे कडुन सदरचे मल:प्रक्रिया केंद्र कार्यान्वित करणे बाबत वारंवार नोटीसद्वारे कळविले आहे. करीता काटई गांव येथील मल:प्रक्रिया केंद्रे व अजय नगर येथील ड्रेनेज पंपींग स्टेशनची देखभाल, निगा व दुरुस्ती करणे कामी रु. १,४१,१७,१३२/- मात्रचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले आहे.

सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षामधील जुनी भुयारी गटार योजनेवरील खर्च या लेखाशिर्षकामध्ये रु.१६० लक्षची तरतुद करण्यांत आलेली आहे. या तरतुदीमधून रु.६०,४२,२५१/- मात्र खर्च झालेला आहे. उर्वरीत रु.९९,९५,७४९/- मात्रची तरतुद शिल्लक आहे. त्यामुळे सदर प्रस्तावाकरीता रु.४१,२१,३८३/- मात्रची तरतुद कमी पडत आहे. सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षाच्या जुनी भुयारी गटार योजनेवरील खर्च या लेखाशिर्षकाच्या तरतुदीमध्ये रु.४१,२१,३८३/- मात्रच्या रक्कमेस अधीन राहुन सदरचा प्रस्ताव सादर करण्यांत आलेला आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | **भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका मालकीचे काटई गावांमधील मलप्रक्रिया केंद्रे व अजय नगर येथील ड्रेनेज पंपींग स्टेशन यांची देखभाल, निगा व दुरुस्ती करणे बाबतच्या प्रस्तावाची ई-निविदा मागविणे कामी मान्यता मिळणे बाबत.** | रु.१,४१,१७,१३२/- |

सद्य कालावधीत मा. महासभा व मा. स्थायी समिती संपुष्टात आलेली आहे. शासन आदेश क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)नवि-१४, दि.०६ जुन २०२२ रोजी नुसार मा. महासभा व मा. स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यांत आलेले आहेत. त्यामुळे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचा कार्यभार हे प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९

चे कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार निविदा विषयक संविदा करण्याचे अधिकार मा. प्रशासक यांना आहेत.

उपरोक्त नमुद पाणी पुरवठा विभागाकडील भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका मालकीचे काटई गावांमधील मलप्रक्रिया केंद्रे व अजय नगर येथील ड्रेनेज पंपींग स्टेशन यांची देखभाल, निगा व दुरुस्ती करणे बाबतच्या कामास आर्थिक व प्रशासकिय मान्यता व महा-ई-टेंडर पोर्टलवर प्रसिद्ध करणे कामी मंजुरी देणे बाबतचा प्रस्ताव.

**प्रशासकिय ठराव क्रमांक :** ४८ **दिनांक :** ~~२८~~ २६/१०/ २०२२

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकडील भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका मालकीचे काटई गावांमधील मलप्रक्रिया केंद्रे व अजय नगर येथील ड्रेनेज पंपींग स्टेशन यांची देखभाल, निगा व दुरुस्ती करणे बाबतचा प्रस्ताव कार्यकारी अभियंता व अति. आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र. . एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)नवि-१४, दि.०६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी विजयकुमार म्हसाळ, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका पाणी पुरवठा विभागाकडील भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका मालकीचे काटई गावांमधील मलप्रक्रिया केंद्रे व अजय नगर येथील ड्रेनेज पंपींग स्टेशन यांची देखभाल, निगा व दुरुस्ती करणे बाबतच्या रु. १,४१,१७,१३२/- मात्रच्या कामास आर्थिक व प्रशासकिय मान्यता व महा-ई-टेंडर पोर्टलवर निविदा प्रसिद्ध करणेस मंजुरी देत आहे.

**(विजयकुमार म्हसाळ)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी नि.शहर महानगरपालिका,भिवंडी.**